# मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
# राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती (SPAC) बैठक क्र. ४ दि. २३/०२/२०२२ चे इतिवृत्त

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत समुदाय आधारीत संस्थांच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) यांना मंजूरी देण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील तरतूदीनुसार, मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट तथा आयुक्त,कृषि यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समिती (SPAC) गठीत करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये स्मार्ट प्रकल्प अमंलबजावणी यंत्रणांच्या विभाग प्रमुखांचा समावेश आहे. मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट तथा आयुक्त,कृषि यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीची (SPAC) ४ थी बैठक दि.२३/०२/२०२२ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास प्राथमिक मान्यता दिलेल्या ५३१ समुदाय आधारीत संस्थांपैकी २२४ संस्थांनी सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) पीआययु स्तरावर सादर केलेले आहेत. प्रकल्प अमंलबजावणी यंत्रणा, कृषि यांचेमार्फत १२४ FPP मंजूरीसाठी स्मार्ट प्रकल्पाकडे सादर करण्यात आलेले आहेत. स्मार्ट प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षाने प्राप्त FPP ची छाननी करुन राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीच्या (SPAC) बैठकीत मंजूसाठी ५९ FPP शिफारसीसह सादर केले आहेत. या आणि अन्य पीआययुच्या FPP मंजूरीबाबत बैठकीत झालेली चर्चा व त्याअनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे: -

| विषय क्र. | विषय | निर्णय आणि कार्यवाहीचा मुद्दा | कार्यवाही कोणी व कधी करावी |
|---|---|---|---|
| १ | स्मार्ट प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षाने छाननी व शिफारस केलेल्या FPP ना मंजूरी देणेबाबत. | पीआययु व पीसीएमयु मार्फत छाननीअंती शिफारस केलेल्या FPP बाबतचे सादरीकरण सभेत करण्यात आले. सादरीकरणातंर्गत समुदाय आधारीत संस्थेने किमान पुर्तता करावयाच्या १० निकष व उपप्रकलपातंर्गत प्रस्तावित घटकांचा समावेश होता. याविषयी समितीने खालीलप्रमाणे निर्देश दिले.<br>१) जमा भाग भांडवलाची (Paid up Share Capital) पडताळणी Ministery of corporate affairs यांच्या वेबसाईटवरील उपलब्ध माहितीनुसार करावी.<br>२) FPP मधील Financial Ratios ची पुन्हा तपासणी करुन आणि त्यानुसार प्रस्तावित अनुदान म्हणून द्यावयाच्या Viability Gap Fund (VGF) बाबत खात्री करावी.<br>३) जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय यंत्रणे मार्फत प्रपत्र-५ मधील १०० गुणापैकी दिलेल्या गुणांबाबत अभिलेख्यांच्या/स्थानिक चौकशीच्या आधारे पडताळणी कशी करावी याबाबत प्रकल्पामार्फत परिपत्रक निर्गमित करण्यात यावे आणि त्यानुसार, सदर गुणांकन करुन जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्राप्त करुन घ्यावे.<br>४) सविस्तर प्रकल्प अहवालाच्या तांत्रिक पडताळणीसाठी वैयक्तीक सल्लागार Independent Assesment Panel (IAP) नोंदणीसाठी जाहिरात प्रसिध्द केली असून दि.१० मार्च २०२२ पर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे. सदर नोंदणीची कार्यवाही पूर्ण होण्यास अजून काही कालावधी लागणार आहे. IAP नोंदणीस कालावधी लागणार आहे तथापि, प्राप्त उपप्रकल्पांना शिघ्रतेने मंजूरी देणे आवश्यक आहे. मा. सचिव कृषि यांच्या सूचनेनुसार, अतिरिक्त प्रकल्प संचालक यांचे मार्फत जागतिक बँकेचे स्मार्ट प्रकल्पाचे टास्क टिम लिडर यांना प्रकल्प पडताळून देण्याबाबत विनंती करण्यात आली, तथापि त्यांनी सर्व उपप्रकल्प पडताळून देण्यास असमर्थता दर्शविली आणि ५ ते १० उपप्रकल्प पडताळून प्रतिक्रिया (comments) देता येतील असे सांगितले. तसेच उपप्रकल्पाला मंजूरी | संबंधित सर्व, पीआययू, |

| विषय क्र. | विषय | निर्णय आणि कार्यवाहीचा मुद्या | कार्यवाही कोणी व कधी करावी |
| --- | --- | --- | --- |
| | | देणे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून प्रकल्पाची जबाबदारी आहे असे मत व्यक्त केले. उपप्रकल्पांची तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्यासाठी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित तज्ञांच्या नेमणूका पूर्ण होण्यासही अजून काही कालावधी लागणार आहे.<br>उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता प्रकल्पांतर्गत Comprehensive training of CBOs & Training on Gender Mainstreaming in Agriculture Value chain for staff of DoA ही कामे करण्यासाठी नियुक्त PriMove या सेवा पूरवठादार संस्थेमार्फत पहिल्या १०० सविस्तर प्रकल्प अहवालांची (FPP) तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता (Techincial & Financial Feasibility) तपासणी करुन घेता येईल काय यावर सभेत चर्चा झाली. या सेवा पुरवठादार संस्थेच्या Key & non Key staff मध्ये Agri Business Expert, Financial Management Expert, Gender & Social Development Expert, Envoirnment Expert & Procurement Expert etc या तज्ञांचा समावेश आहे आणि हे तज्ञ उपप्रकल्पांची तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्यासाठी आवश्यक आहेत. अशा तज्ञांच्या मनुष्यदिनाचा मोबदला करारानुसार ठरलेला आहे. PriMove संस्थेमार्फत उपप्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचा नमुना (Template) तसेच Business calculator तयार करुन घेतलेले आहे तसेच प्रकल्प अहवाल कसा तयार करावा याबाबतचे Training module विकसित करुन घेऊन Master trainers चे ToT ही त्यांचेमार्फत घेण्यात आलेले आहे.<br>उपरोक्त बाबी लक्षात घेता PriMove संस्था उपप्रकल्पांची तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून प्रस्ताव घेवुन मुळ करारात सुधारणेसह मुदतवाढ देणेबाबत जागतिक बँकेशी चर्चा करावी. चर्चे नुसार याबाबतचा प्रस्ताव प्रकल्प संचालक यांचेकडे त्वरीत सादर करावा.<br>५) पहिल्या १०० उपप्रकल्पाच्या तपासणी नंतरच्या प्रस्तावांची तपासणी IAP, पीआययु/पीसीएमयु मधील तज्ञ /अधिकारी यांचेमार्फत (Inhouse) करण्यात यावी.<br>६) यापुढील राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीच्या सभेस सर्व समिती सदस्यांनी व्यक्तिशः हजर रहावे.<br>७) वरील पध्दतीने उपप्रकल्पाची तपासणी करुन समितीसमोर FPP मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करावा. | संबंधित सर्व |

उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(धीरज कुमार, भा.प्र.से)
०८ प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे

जा.क्र/स्मार्ट/पीसीएमयू/SPAC इतिवृत्त / ३४८ /२०२२
दिनांक:-०७/०३/२०२२

प्रत :-१) विभाग प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व यांना माहीतीस्तव सादर.
२) नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व यांना कार्यवाहीस्तव अग्रेषीत .

# स्मार्ट प्रकल्पांतर्गत राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीच्या (SPAC) व सीबीओ निवड समिती बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी.

स्थळ :- कृषि आयुक्तालय, पुणे

दिनांक :- २३/०२/२०२२ वेळ :- स.११.०० वा.

| अ. क्र. | नाव (सर्वश्री) | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १) | मा.धीरज कुमार (भा.प्र.से.) | प्रकल्प संचालक, स्मार्ट तथा आयुक्त कृषि | |
| २) | मा. सचिंद्र प्रताप सिंह (भा.प्र.से.) | आयुक्त पशुसंवर्धन | |
| ३) | दशरथ तांभाळे | संचालक आत्मा तथा अति. प्र.सं. स्मार्ट | |
| ४) | | | |
| ५) | | | |
| ६) | | | |
| ७) | | | |
| ८) | | | |
| ९) | श्रीमती. पी. एस वरादकर | मोहीम अधिकारी, आयुक्त (कृषि) | |
| १०) | श्री अजय श्री. पाटील | तंत्र अधिकारी, स्मार्ट | |
| ११) | श्री सिद्धाराम माशाळे | समन्वयक, माविम PIU. | |
| १२) | डॉ. कल्पना करगावकर | नोडल ऑफिसर, PIU-AHD | |
| १३) | डॉ काळे डी.के. | सहाय्यक सल्लागार पशुसंवर्धन | |

| अ. क्र. | नाव (सर्वश्री) | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १४) | CA Shilpa U. Bathia | Finance Consultant SMART | [signature] |
| १५) | CA Anirdhati Sorcis | Finance consultant (Team member) SMART | [signature] |
| १६) | Kutal Pratibha | Technical ~~asst~~ officer | [signature] |
| १७) | Dr. Preeti Sawairam | Tech. Officer, capacity Bldg. | [signature] |
| १८) | Kuldeep Jadhav | Agribusiness Value chain specialist | [signature] |
| १९) | Shital Kadam | Nodal officer PIU, MSRLM | [signature] |
| २०) | Shailesh Kulkarni | Mission Manager (Farm) MSRLM, Navi Mumbai. | [signature] |
| २१) | Shahuraj Hire | Technical officer PIU-DOM | [signature] |
| २२) | Rajendra Palekar | Technical officer PIU - DOM | [signature] |
| २३) | J. J. Jadhav | Manager, PIU-MSAMB | [signature] |
| २४) | A. A. Bhosale | Assistant PIU-MSAMB | [signature] |
| २५) | Abhimanyu Bhosale | Block Tech Manager | [signature] |
| २६) | S. M. Pachore | Assistant Director Directorate of Marketing | [signature] |
| २७) | Mr. Amol Mane | Agril. Assistant. | [signature] |
| २८) | Mr. Balaji Regaejeel | Assistant, SMART. | [signature] |
| २९) | Mr. Avinash S. Bhosale | Associate ABE | [signature] |
| ३०) | | | |